॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

■ अहिल्यानगर ■ मंगळवार, दि. १९ मे २०२६ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३६१ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145 www.veerbhuminews.com


*** सुविचार ***

सर्व गोष्टींच्या बाबतीत नेहमीच निराशेपेक्षा आशा बाळगणे चांगलेच असते.

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### नीट

सरस्वतीला मान्य नाही
हे असे लक्ष्मीपुढे झुकणे
इलाजापेक्षा भयंकर हे
वाढत चाललेय दुखणे
क्लासवाले तिथे बसून
काय काथ्या कूटतात
प्रश्नपत्रिकेची गोष्ट नाही
जिथे आमदारच फुटतात

## SPOT NEWS

### चाऱ्याची इतर जिल्ह्यांत वाहतूक करण्यास प्रतिबंध

● **अहिल्यानगर** – भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १६३ नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करत जिल्हादंडाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी जिल्ह्यात उत्पादित होणारा हिरवा व कोरडा चारा, मुरघास आणि टोटल मिक्स राशन (टी.एम.आर.) यांची इतर जिल्ह्यांत वाहतूक करण्यास मनाई करणारा आदेश जारी केला आहे. पुढील दोन महिन्यांसाठी हा आदेश लागू राहणार असल्याचेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

### २० मे रोजी औषध विक्रेत्यांचा देशव्यापी बंदची

● **पुणे** – ऑनलाईन औषध विक्री आणि कॉर्पोरेट कंपन्यांकडून होत असलेल्या अव्यावसायिक स्पर्धेविरोधात अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेने दि. २० मे रोजी देशव्यापी बंदची घोषणा केली आहे देशभरातील सुमारे साडे बारा लाख औषध विक्रेते बंदमध्ये सहभागी होणार असल्याची माहिती संघटनेचे पुणे अध्यक्ष संदीप पारख यांनी पत्रकार परिषदेत सांगितली. ऑनलाईन औषध विक्रीसंदर्भात अद्याप स्पष्ट कायदेशीर तरतूद नसताना देशभरात मोठ्या प्रमाणावर ऑनलाईन विक्री सुरू आहे. कोरोना काळात औषधांची होम डिलिव्हरी करण्यासाठी सरकारने तात्पुरती सूट दिली होती. महामारी संपल्यानंतरही ती मागे घेण्यात आलेली नाही.या परिस्थितीचा फायदा घेत ऑनलाईन कंपन्या मोठ्या प्रमाणात सवलती देत बाजारपेठ ताब्यात घेण्याचा प्रयत्न करत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

### शिवराज मोटेगावकरला ९ दिवसांची सीबीआय कोठडी

● **लातूर** – देशभरात खळबळ उडवून दिलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणाच्या तपासात सीबीआयने धाडसत्र मोहिम राबवत महाराष्ट्रातील पुणे, नाशिक, अहिल्यानगर, लातूर जिल्ह्यातून अनेकांना ताब्यात घेतले असून सीबीआयने आरसीसी या खासगी कोचिंग क्लासेसचा संचालक शिवराज मोटेगावकर याला ताब्यात घेतल्यानंतर आता अटक केले आहे. दरम्यान शुक्रवारी त्याची तब्बल ११ तास चौकशी करण्यात आली होती. त्यानंतर, काल त्यांच्या ट्युशनमध्ये सीबीआयचे पथक दाखल झाले होते.

# नगर विधान परिषदेसाठी १८ जूनला मतदान

## २२ जूनला मतमोजणी । ४६१ मतदार या निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावणार

● **अहिल्यानगर । वीरभूमी**–

भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषद स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ द्विवार्षिक निवडणूक २०२६ जाहीर केली असून अहिल्यानगर जिल्ह्यात निवडणुकीची आचारसंहिता सुरु झाली आहे. निवडणूक शांततापूर्ण, पारदर्शक आणि निष्पक्ष वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासनाने तयारी सुरू केली असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी दादासाहेब गिते, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) दत्तात्रय कवितके, तहसीलदार श्वेता संचेती, नायब तहसीलदार विशाल सदनापूर आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, या निवडणुकीसाठी दि. २५ मे २०२६ रोजी अधिसूचना जारी करण्यात येणार असून दि. १ जूनपर्यंत उमेदवारांना नामनिर्देशन अर्ज दाखल करता येणार आहेत. दि. २ जून रोजी अर्जांची छाननी होणार असून दि. ४ जून ही अर्ज माघारी घेण्याची अंतिम मुदत राहणार आहे. दि.



१८ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होईल. तर २२ जून रोजी मतमोजणी होऊन २५ जून रोजी निवडणूक प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

नामनिर्देशनपत्रे जिल्हाधिकारी यांचे दालन, दुसरा मजला जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत स्वीकारण्यात येणार आहेत. निवडणूक लढविण्यासाठी उमेदवाराचे महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही विधानसभा मतदारसंघात नाव असणे बंधनकारक असून त्याची साक्षांकित प्रत नामनिर्देशन पत्रासोबत जोडणे आवश्यक आहे.

जिल्ह्यातील महानगरपालिका, कॅन्टोन्मेंट, नगरपरिषदा व नगरपंचायतींचे सदस्य मतदार म्हणून सहभागी होणार आहेत. अहिल्यानगर महानगरपालिका, संगमनेर, कोपरगाव, राहाता, श्रीरामपूर, राहुरी, देवळाली प्रवरा, पाथर्डी, श्रीगोंदा, शिर्डी, शेवगाव, कर्जत, अकोले, जामखेड व पारनेर येथील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्यांचा या निवडणुकीत मतदार म्हणून समावेश आहे. एकूण ४६१ मतदार या निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावणार असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

निवडणुकीसाठी मतपत्रिकेचा वापर करण्यात येणार असून मतदारांनी पसंती क्रमानुसार मतदान करावयाचे आहे. मतदान प्रक्रियेसाठी आवश्यक जम्बो बॅलेट बॉक्सची व्यवस्था करण्यात आली असून मतदान केंद्रांची व्यवस्था संबंधित तहसील कार्यालयांमध्ये करण्यात आली आहे. प्रत्येक तालुक्यात तहसीलदार यांच्या कक्षात मतदान केंद्र निश्चित करण्यात आले आहेत. तर या निवडणुकीची मतमोजणी जिल्हास्तरावर करण्यात येणार आहे. निवडणुकीसाठी खुल्या प्रवर्गासाठी १० हजार रुपये तर अनुसूचित जाती, जमातीसाठी ५ हजार रुपये इतकी अनामत रक्कम असणार आहे.

निवडणूक प्रक्रियेदरम्यान आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश देण्यात आले असून महाराष्ट्र प्रिव्हेन्शन ऑफ डिफेसमेंट ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट १९९५ तसेच भारत निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार सार्वजनिक अथवा खासगी मालमत्तेवर अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स, भित्तीपत्रके, झेंडे किंवा घोषणा लावण्यास बंदी घालण्यात आली आहे. नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. या निवडणूक प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाकडून स्वतंत्र निवडणूक निरीक्षकांची नियुक्ती करण्यात येणार असल्याची माहितीही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यावेळी दिली.

# एसटी प्रवास महागणार

## परिवहन मंत्र्यांचे दरवाढीचे संकेत

पेट्रोलियम कंपन्यांनी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ केल्याने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ अर्थात एसटीचे आर्थिक गणित बिघडले असून, दिवसाला ३३ लाख ७० हजार रुपयांचा अतिरिक्त बोजा पडत आहे. संभाव्य आर्थिक नुकसान भरून काढण्यासाठी एसटी महामंडळासमोर प्रवाशी भाडेवाढीशिवाय पर्याय राहिलेला नाही असे सांगत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दरवाढीची संकेत दिले आहेत. यामुळे एसटीचा प्रवासही महागणार आहे.

आखाती युद्धामुळे आंतरराष्ट्रीय बाजारातले तेलाचे दर प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर ३ रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. या इंधन दरवाढीचा एसटीवर होणा-या परिणामाचा आढावा घेण्यासाठी सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात बैठक झाली. डिझेलच्या दरात झालेल्या वाढीमुळे महामंडळावर वार्षिक सुमारे १२४ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक बोजा पडणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

एसटी महामंडळाला दररोज सरासरी १०.८७ लाख लिटर डिझेलची आवश्यकता भासते. सध्या इंडियन ऑईल कॉर्पोरेशनमार्फत डिझेलचा पुरवठा केला जात असून मागील आठवड्यात प्रति लिटर ८८.२१ रुपये असलेला दर आता वाढून ९१.३१ रुपये झाला आहे. या दरवाढीमुळे महामंडळाला दररोज अंदाजे ३३ लाख ७० हजार रुपयांचा अतिरिक्त खर्च सहन करावा लागत आहे. मासिक स्तरावर हा भार सुमारे १० कोटी तर वार्षिक सुमारे १२४ कोटी रुपयांपर्यंत जाणार असल्याची माहिती सरनाईक यांनी दिली.

एसटी महामंडळ सध्या आर्थिक अडचणींचा सामना करीत असून एप्रिल २०२६ मध्ये महामंडळाला सुमारे ७६ कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागला आहे. वाढत्या इंधन खर्चाचा थेट परिणाम महामंडळाच्या आर्थिक स्थितीवर होत असून, भविष्यात प्रवासी भाडेवाढीचा निर्णय घेणे आवश्यक ठरू शकते, असेही सरनाईक म्हणाले. मात्र कोणतीही भाडेवाढ तातडीने लागू करण्यात येणार नाही. इंधन दरवाढीच्या अनुषंगाने भाडेवाढीचा प्रस्ताव राज्य परिवहन प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात येणार आहे.

संबंधित प्राधिकरणाची मान्यता मिळाल्यानंतरच अंतिम निर्णय घेण्यात येईल, असे सरनाईक यांनी सांगितले. एसटीने प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य प्रवाशांवर कमीत कमी आर्थिक भार पडावा यासाठी सरकार विविध पर्यायांचा विचार करीत आहे.

# ३० जून पूर्वी शेतकरी कर्ज माफी

● **पुणे । वीरभूमी**–

येत्या ३० जून पूर्वी कर्ज माफ करण्यात येणार आहे असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांना सांगितले. ते म्हणाले, याबाबतची तयारी अंतिम टप्प्यात आहे. कॅबिनेट सबकमिटीची बैठक झाली काही माहिती मागवली आहे. ती आली की प्रक्रिया सुरु होणार आहे.

शेती अधिक शाश्वत, तंत्रज्ञानाधारित आणि उत्पादनक्षम करण्यासाठी आधुनिक संशोधन व नवकल्पनांची जोड आवश्यक असून कृषी नवसंकल्पना स्पर्धेसारखे उपक्रम भविष्यातील कृषी व्यवस्थेला नवी दिशा देणारे ठरत आहेत असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

पुढील वर्षापासून 'पुणे कृषी नवसंकल्पना स्पर्धा' राज्यव्यापी स्वरूपात आयोजित करण्यात येईल तसेच स्पर्धेतील प्रथम पुरस्कार दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाने दिला जाईल, अशी घोषणा त्यांनी केली. कृषी विभागाच्यावतीने कृषी महाविद्यालय येथे आयोजित दुसऱ्या 'पुणे कृषी नवसंकल्पना स्पर्धा–२०२६'च्या समारोप व पारितोषिक वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, खासदार मेधा कुलकर्णी, आमदार योगेश टिळेकर, हेमंत रासने, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्रमणी, कृषी आयुक्त सूरज मांढरे, आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्य शासनाचा कृषी विभाग आणि जिल्हा प्रशासनाने संयुक्तपणे राबविलेला हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून त्यामागे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विशेष योगदान आहे. यंदाच्या स्पर्धे साठी तब्बल १ हजार २९० अर्ज प्राप्त झाले असून विविध क्षेत्रांतील नाविन्यपूर्ण प्रकल्पांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. गेल्या वर्षीच्या स्पर्धेतील चार संशोधन प्रकल्पांचे उत्पादन प्रत्यक्षात सुरू झाले असून आणखी १२ उत्पादने लवकरच बाजारात येणार आहेत.


या स्पर्धेतून केवळ कल्पना मांडल्या जात नाहीत, तर त्या प्रत्यक्ष उत्पादनात उतरून शेतकऱ्यांच्या जीवनात बदल घडवून आणण्याची क्षमता ठेवतात. यंदाच्या स्पर्धेतील १८ निवडक नवकल्पनांना पुढील टप्प्यात विशेष मदत व मार्गदर्शन देण्यात येणार असून त्यापैकी किमान १२ प्रकल्प बाजारात यावेत यासाठी शासन प्रयत्नशील राहील अशी ग्वाही फडणवीस यांनी दिली. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने उत्पादन खर्च कमी करून उत्पादकता वाढविण्याची क्षमता या तंत्रज्ञानात असून भविष्यात त्याची अचूकता आणखी वाढेल. पीक विमा प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी मानवरहित यंत्रे आणि उपग्रह नकाशांकनाच्या माध्यमातून अचूक अहवाल तयार करणारे तंत्रही उपयुक्त ठरणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

कृषी मंत्री भरणे म्हणाले, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संकल्पनेतून या स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले आहे. बदलत्या काळानुसार शेतकऱ्यांनी कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे आवश्यक आहे. पुणे ॲग्री हॅकॅथॉन–२०२६ अंतर्गत उभारण्यात आलेल्या विविध नाविन्यपूर्ण प्रकल्प आणि तंत्रज्ञान प्रदर्शनाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाहणी केली. कृषी क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित उपाययोजना, स्मार्ट सिंचन प्रणाली, ड्रोन तंत्रज्ञान, मृदा परीक्षण, स्वयंचलित उपकरणे तसेच शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या विविध संशोधनात्मक प्रकल्पांविषयी मुख्यमंत्री फडणवीस यांनी उत्सुकतेने माहिती घेतली.

# देशात 'एल निनो'चे संकट अधिक गडद

## कृषी संशोधन परिषदेचा इशारा खरीप हंगामाला फटका बसणार?

● **नवी दिल्ली । वीरभूमी**–



देशातील खरीप हंगामावर यंदा एल निनोचा मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. भारतीय कृषी संशोधन परिषद(आयसीएआर) अंतर्गत करण्यात आलेल्या एका अभ्यासांतर्गत, एल निनोमुळे मान्सूनवर मोठ्या प्रमाणात परीणाम होणार आहे. त्यामुळे याचा प्रामुख्याने खरीप पिकांवर परीणाम होणार आहे. त्यामुळे हिंदुस्थानातील अनेक भागांमध्ये खरीप पिकांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घटणार आहे. अभ्यासानुसार, एल निनोच्या काळात देशातील अनेक जिल्ह्यांमध्ये भात आणि मक्याच्या उत्पादनावर सर्वाधिक परिणाम दिसून आला आहे. सोयाबीन, कापूस, डाळी आणि तेलबिया पिकांना फार मोठा फटका बसण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

एल निनोचा परिणाम आंध्र प्रदेश, बिहार, छत्तीसगड, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, झारखंड आणि ओडिशा यांसारख्या प्रमुख तांदूळ उत्पादक राज्यांमध्ये सर्वाधिक दिसून आला आहे. या अभ्यासात असेही आढळून आले की अशा प्रकारच्या हवामानविषयक घटना घडत असताना ३६ जिल्ह्यांमध्ये ज्वारी आणि बाजरीच्या उत्पादनात प्रत्येकी १० टक्क्यांहून अधिक घट झाली आहे.

२०२३ मध्ये 'एल्सेव्हियर' द्वारे प्रकाशित 'क्लायमेट सर्व्हिसेस' या नियतकालिकातील या अभ्यासात २००२, २००४ आणि २००९ या तीन 'एल निनो' वर्षांचा आढावा घेण्यात आला आहे. भारतीय हवामान विभागाने यंदा सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तवला आहे. एल निनोमुळे मान्सूनवर मोठ्या प्रमाणात परीणाम होणार असल्याने, शेतक-यांची चिंता वाढली आहे.

खरीप हंगाम मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून असल्याने पावसातील कमतरता थेट शेती उत्पादनावर परिणाम करू शकते. कृषी तज्ज्ञांच्या मते, उत्पादन घटल्यास अन्नधान्यांच्या किमती वाढण्याची शक्यता आहे. त्यातच खतांच्या वाढत्या किमती आणि जागतिक तणावामुळे शेती क्षेत्रासमोर दुहेरी आव्हान निर्माण झाले आहे.

# परळी वैजनाथ, भीमाशंकर, देहू सहा सहा तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी ९९३ कोटीचा निधी मंजूर !

## तीर्थक्षेत्र विकासकामे कालमर्यादेत पूर्ण करण्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांचे आदेश

● **मुंबई । वीरभूमी**–

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी झालेल्या तीर्थक्षेत्र विकास आराखडा शिखर समितीच्या बैठकीत सहा तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी ९९३ कोटी ७२ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. यामुळे संबंधित तीर्थक्षेत्रांचा कायापालट होणार असून भाविक, पर्यटकांना चांगल्या सुविधा मिळणार आहेत. तीर्थक्षेत्र विकासकामे दर्जेदार आणि कालमर्यादेत पूर्ण करण्याचे तसेच तीर्थक्षेत्र विकास आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी बैठकीत दिले.

आजच्या बैठकीत पुणे जिल्ह्यातील श्री क्षेत्र भीमाशंकर आदर्श गाव विकासासाठी १७२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. या विकास आराखड्याअंतर्गत अत्याधुनिक बस स्थानक आणि पार्किंग सुविधा करण्यात यावी. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी विविध वळण रस्ते आणि रस्ते रुंदीकरणाची कामे हाती घेण्यात यावीत. सध्या २.७ मीटर रुंदी असलेले रस्ते ७ मीटरपर्यंत रुंद करावा. भक्त आणि पर्यटकांच्या सुविधांसाठी मंदिर परिसरात पादचारी मार्ग, कव्हर्ड कॉरिडॉर, फ्लोअरिंग आणि एम्फीथिएटर, २५७ केएलडी क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प आदी योजना हाती घेण्याची सूचना फडणवीस यांनी बैठकीत केली.

संत तुकाराम महाराज यांचे देहू येथील जन्मस्थान, वैकुंठगमन मंदिर परिसर तसेच भंडारा डोंगर परिसराच्या संवर्धन आणि विकासासाठी ४१ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये रस्त्यांचे सुशोभीकरण, स्वच्छता व्यवस्था, पिण्याच्या पाण्याच्या सुविधा, पार्किंग व्यवस्था, भाविकांसाठी निवास सुविधा तसेच माहिती केंद्र उभारणे, भंडारा डोंगर परिसरात हरित क्षेत्र संवर्धन, वृक्षारोपण आणि नैसर्गिक सौंदर्य अबाधित ठेवण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात, असे निर्देश फडणवीस यांनी दिले.

सातारा जिल्ह्यातील ऐतिहासिक किल्ले अजिंक्यताराचे जतन, संवर्धन आणि परिसर सुशोभीकरणासाठी १३४.८० कोटी रूपयांचा विकास आराखडा आहे. यामध्ये नियोजित असलेल्या पायाभूत सुविधांचा विकास, नियोजित प्रेक्षक गॅलरी, नवे पादचारी मार्ग आणि लँडस्केपिंग,राज सदरेचे पुनरुज्जीवन, बुरूजांचे संवर्धन, पर्यटन आकर्षणे, अत्याधुनिक लटकता पूल,स्वच्छता आणि विश्रांती गृहांची कामे तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली वेळेत पार पाडावीत, असे फडणवीस यांनी सांगितले.

संगम माहुली समाधीस्थळ संवर्धनासाठी १३३ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. याअंतर्गत महाराणी ताराबाई, महाराणी येसूबाई आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या समाधी स्थळांचा जीर्णोद्धार आणि लँडस्केप विकास केला जाणार आहे. याशिवाय, ऐतिहासिक संगमेश्वर मंदिर आणि घाटाचे संवर्धन, नवीन हँगिंग ब्रिज (झुलता पूल), व्ू इंग गॅलरी आणि सुसज्ज पाथ वेची निर्मिती करून या परिसराला जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ बनविण्यात येईल, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वेरुळ येथील प्रसिद्ध घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिराच्या विकासासाठी सुधारित आराखडा तयार करण्यात आला आहे. या प्रकल्पाची एकूण



किंमत आता २१०.४५ कोटी रुपये प्रस्तावित करण्यात आली असून, यामध्ये ५३.८२ कोटींच्या वाढीव निधीची मागणी समाविष्ट आहे. सध्या या ठिकाणी भाविकांसाठी अत्याधुनिक भक्त निवास, दर्शन बारी (प्रतीक्षागृह), शॉपिंग कॉम्प्लेक्स, फंक्शन हॉल, घाट आणि १.६ किमीचा बा वळण रस्ता (बायपास रोड) यांसारखी कामे गतीने करावीत, असे निर्देश फडणवीस यांनी दिले.

श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर परिसर मूळ आराखड्यातील पुढील नवीन कामांसाठी सुमारे ३०१.५४ कोटी रुपयांचा अतिरिक्त आराखडाही तयार करण्यात आला आहे. तीन टप्प्यात या मंदिराची कामे वेळेत पूर्ण करावीत. पहिल्या टप्प्यात प्रवेशद्वारे, डिजिटल रांग व्यवस्था, प्रतीक्षागृहे, अन्नछत्र, योग-ध्यान केंद्र आणि मंदिर परिसराचे सौंदर्यीकरण तर दुसऱ्या टप्प्यात हरिहर आणि मार्कंडेय तीर्थांचे वैज्ञानिक पुनरुज्जीवन, घाट, सायकल ट्रॅक, दिव्यांगसुलभ सुविधा, फूड कोर्ट आणि सीसीटीव्ही सुरक्षा व्यवस्था उभारणे तर तिस-या टप्प्यात मेरू पर्वतावर भव्य शिवमूर्ती, शिवपुराण आणि वैदिक संग्रहालय, ॲम्फीथिएटर, लेझर लाईट अँड साऊंड शो आणि ध्यानस्थळे विकसित करण्याची सूचना फडणवीस यांनी केली. सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार,वनमंत्री गणेश नाईक, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले,आमदार दिलीप वळसे पाटील, धनंजय मुंडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल आदी उपस्थित होते.

SPOT NEWS



## मारुतीराव कोते अभिनव पब्लिक स्कूलच्या विद्यार्थिनीचा राज्यस्तरीय गौरव

**● अकोले । वीरभूमी –**

धर्मवीर संभाजीराजे प्रतिष्ठान, महाराष्ट्र आयोजित राष्ट्रीय व राज्यस्तरीय महाराष्ट्र गौरव पुरस्कार सोहळा – २०२६ हा कार्यक्रम दि. १७ मे २०२६ रोजी शिर्डी येथे उत्साहात पार पडला. या सोहळ्यात मारुतीराव कोते अभिनव पब्लिक स्कूलच्या विद्यार्थिनी कु. वेदिका सुनील एरंडे हिला महाराष्ट्र राज्य योगा व नृत्यांगना गौरव पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खा. भाऊसाहेब वाकचौरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. योगा व नृत्य क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी, सातत्यपूर्ण मेहनत आणि उत्कृष्ट प्रदर्शनाच्या आधारावर वेदिका एरंडे हिने हा मानाचा पुरस्कार प्राप्त केला आहे. तिच्या या यशामुळे शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मधुकरराव नवले, सचिव विक्रम नवले, कोषाध्यक्ष तथा वसुंधरा अकॅडमी प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख, अभिनव पब्लिक स्कूलच्या प्राचार्या अल्फोन्सा डी. तसेच कार्यालयीन अधीक्षक दिलीपकुमार मंडलिक यांनी तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## रस्त्याच्या काँक्रिटीकरण कामाचा आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते शुभारंभ

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

प्रभाग क्रमांक १३ मधील सारसनगर–शांतीनगर परिसरातील बहुप्रतिक्षित रस्त्याच्या काँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते संपन्न झाला. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रस्त्याच्या प्रश्नाला अखेर मार्ग मिळाल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले. नारळ फोडून या कामाचा शुभारंभ करण्यात आला. या प्रसंगी नगरसेवक सुरेश बनसोडे, अविनाश घुले, विपुल शेट्टीया, राजेंद्र पडोळे, संतोष सूर्यवंशी, शिरील जाधव, विक्टर पवार, जेकब जाधव, सुरेश आरोळे, दीपक साळवे, मनोज साळवे, अंकुश मोहिते, जी. एम. जेम्स, जॉन राजू अगस्ती, नंदकुमार परदेशी, ठाकूर दास परदेशी, फ्रांकलीन कुटिनो, सुषमा प्रभाकर, बार्नबस अगस्ती, नित्यानंद कांबळे नीरज मकासरे, चंद्रकांत देठे, योगेश शेळके, अमित कनोजिया, प्रशांत पवार, रवी थोरवे, गिरीश परदेशी, अशोक सोनवणे, प्रीतम गायकवाड, किरण आल्हाट, किशोर शिंदे, अविनाश चौधरी, गणेश साबळे, भूषण तांबे, नितीन साबळे, मनीष कनोजिया, ओम तांबे, गणेश कोल्हे आकाश शिंदे, प्रकाश भिंगारदिवे आदींसह नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमात बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, शहरातील प्रत्येक प्रभागात दर्जेदार विकासकामे पोहोचवण्याचा आमचा सातत्याने प्रयत्न सुरू आहे. नागरिकांना चांगले रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका व प्रशासनाच्या माध्यमातून नियोजनबद्ध कामे केली जात आहेत. शांतीनगर परिसरातील नागरिकांनी अनेक वर्षांपासून रस्त्याच्या समस्येबाबत मागणी केली होती. त्या मागणीची दखल घेत चारही नगरसेवकांच्या माध्यमातून या काँक्रिटीकरण कामासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, भविष्यातही परिसराच्या विकासासाठी कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ते पुढे म्हणाले की, केवळ भूमिपूजन करून थांबणे हा आमचा हेतू नसून कामाची गुणवत्ता आणि नागरिकांचे समाधान यालाच आम्ही प्राधान्य देत आहोत. नागरिकांच्या पैशातून होणारी प्रत्येक कामे टिकाऊ आणि दर्जेदार असली पाहिजेत. शांतीनगर परिसरातील रस्ते, पाणी व स्वच्छतेचे प्रश्न टप्प्याटप्प्याने सोडवले जाणार असून नागरिकांना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागू नये यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. आमदार जगताप यांनी शहराचा विकास केवळ मध्यवर्ती भागापुरता मर्यादित न राहता उपनगर आणि सर्वसामान्य नागरिकांच्या वस्त्यांपर्यंत पोहोचला पाहिजे, असे सांगत शांतीनगर परिसराचा विकास अधिक गतीने करण्यात येणार असल्याचे नमूद केले. विकासकामांमध्ये पारदर्शकता आणि गुणवत्तेला प्राधान्य देत शहराचा चेहरामोहरा बदलण्याचा प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी नगरसेवक सुरेश बनसोडे म्हणाले की, आमदार संग्राम जगताप यांच्या विशेष प्रयत्नांमुळेच शांतीनगर परिसरात मोठ्या प्रमाणावर विकासकामे सुरू झाली आहेत. त्यांनी उपलब्ध करून दिलेल्या निधीमुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित प्रश्न मार्गी लागत आहेत. नागरिकांच्या समस्या सातत्याने आमदारांच्या निदर्शनास आणून देण्यात आल्या आणि त्यांनी तत्काळ सकारात्मक प्रतिसाद देत कामांना मंजुरी मिळवून दिली.

संपादकीय

# बळीराजाच्या घामाला मोल कधी मिळणार?

**इराण–अमेरिका संघर्षाच्या पार्श्वभूमीवर देशातील आर्थिक परिस्थिती अधिकच अस्थिर होत चालली आहे. आंतरराष्ट्रीय घडामोडींचा थेट परिणाम सामान्य नागरिकांच्या खिशावर होत असून, जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती गगनाला भिडत आहेत. पेट्रोल–डिझेल दरवाढ, गॅस टंचाई आणि वाहतूक खर्च वाढल्याने सर्वच वस्तूंचे भाव वाढले आहेत. त्यामुळे सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले असून, महागाईने जनतेचे जगणे कठीण केले आहे. मात्र या परिस्थितीत सर्वात मोठा फटका बसत आहे तो देशाच्या कणा मानल्या जाणाऱ्या शेतकऱ्याला.**

एकीकडे बाजारात सर्व वस्तू महाग होत असताना, दुसरीकडे शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतीमालाला मात्र योग्य भाव मिळत नाही. ही अत्यंत गंभीर आणि चिंताजनक बाब आहे. एखादे पीक घेण्यासाठी शेतकरी दिवस–रात्र कष्ट करतो, हजारो रुपये खर्च करतो, निसर्गाच्या लहरीपणाशी झुंज देतो; परंतु शेवटी बाजारात त्याच्या मालाला मिळणारा दर पाहिला तर डोळ्यात पाणी येते.

सध्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. तीन–चार महिने काबाडकष्ट करून, बियाणे, खत, औषधे, मजुरी, पाणी, वीज आणि वाहतूक यावर हजारो रुपये खर्च करून घेतलेल्या कांद्याला बाजार समितीत कवडीमोल भाव मिळत आहे. सोलापूर बाजार समितीतील एका घटनेने संपूर्ण व्यवस्थेचे विदारक वास्तव समोर आणले. एका शेतकऱ्याने आठ गोणी कांदा विक्रीसाठी आणला. त्याला सर्व कांद्याचे मिळून फक्त ७१० रुपये मिळाले. त्यातून हमाली, तोलाई, वाहतूक खर्च वजा केल्यानंतर त्याच्या हातात अवघे १८९ रुपये उरले. म्हणजे उत्पादन खर्च तर दूरच, बारदाणा आणि मजुरीचाही खर्च निघाला नाही. उलट खिशातून पैसे घालण्याची वेळ त्या शेतकऱ्यावर आली.



**महादेव दळे**

**संपादक, वीरभूमी**

**मो. ९४२०८०२१४५**

ही परिस्थिती केवळ कांद्यापुरती मर्यादित नाही. टोमॅटो, सोयाबीन, कापूस, डाळी, भाजीपाला अशा अनेक पिकांबाबत शेतकऱ्यांची अवस्था सारखीच आहे. एका बाजूला ग्राहक बाजारात महागाईने त्रस्त आहे, तर दुसऱ्या बाजूला उत्पादक शेतकरी मात्र तोट्यात आहे. मग नफा जातो तरी कुठे? हा प्रश्न आता गंभीरपणे विचारण्याची वेळ आली आहे.

आज बाहेरगावी गेल्यावर पाण्याची बाटली सहज २० रुपयांना विकत घेतली जाते. गॅस टंचाईमुळे खाद्यपदार्थांचे दर किमान पाच रुपयांनी वाढले आहेत. राज्य परिवहन मंडळाच्या बसमध्ये प्रवास केला तर तिकीटामागे दोन रुपये स्वच्छता कर आकारला जातो. दररोज जवळपास ५० लाख प्रवासी एसटीने प्रवास करतात. म्हणजे दिवसाला तब्बल एक कोटी रुपयांचा स्वच्छता कर जमा होतो. मग प्रश्न असा निर्माण होतो की, या अगोदर एसटी बसची स्वच्छता होत नव्हती का? सर्वसामान्य नागरिक कोणताही प्रश्न न विचारता हा खर्च सहन करतो.

सेतू केंद्रात किंवा शासकीय कार्यालयात एखादा दाखला काढायचा असेल, तर मागितलेली रक्कम प्रतिष्ठेचा प्रश्न मानून लोक सहज देतात. परंतु भाजी बाजारात मात्र शेतकऱ्याच्या मालासाठी घासाघीस केली जाते. शेतकऱ्याने घाम गाळून, जीवाचे रान करून पिकवलेल्या मालाला योग्य भाव देताना मात्र लोक मागे का हटतात? हा प्रश्न समाजाने स्वतःला विचारण्याची गरज आहे.

आजची तरुण पिढी शेतीकडे पाठ फिरवत आहे. कारण शेतीत मेहनत जास्त आणि उत्पन्न अनिश्चित आहे. शेतात काम करण्यासाठी मजूर मिळत नाहीत. हवामान बदल, अवकाळी पाऊस, दुष्काळ, गारपीट आणि वाढते उत्पादन खर्च यामुळे शेती दिवसेंदिवस अधिकच संकटात सापडत आहे. अशा परिस्थितीत जर शेतकऱ्याला हमीभाव, बाजारपेठ आणि आर्थिक सुरक्षा मिळाली नाही, तर भविष्यात शेती व्यवसाय टिकणार कसा? हा अत्यंत गंभीर प्रश्न आहे.

शासनाने केवळ घोषणा न करता ठोस धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे. शेतमालाला हमीभावाची प्रभावी अंमलबजावणी, थेट बाजारपेठ उपलब्ध करून देणे, साठवणूक सुविधा वाढवणे, निर्यात धोरण सुसंगत ठेवणे आणि मध्यस्थांची साखळी कमी करणे ही काळाची गरज आहे. तसेच शेतीमाल प्रक्रिया उद्योगांना चालना दिल्यास शेतकऱ्याला अधिक फायदा मिळू शकतो.

शेतकऱ्याला बळीराजा म्हणणे सोपे आहे; पण त्याला त्याचा हक्काचा मोबदला देणे तितकेच महत्त्वाचे आहे. कारण शेतकरी टिकला तरच देश टिकेल. अन्यथा भविष्यात अन्नधान्याचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे आजच शासन, समाज आणि ग्राहक यांनी एकत्रितपणे विचार करून शेतकऱ्याच्या घामाला योग्य मोल देण्याची वेळ आली आहे. अन्यथा येणारा काळ खरोखरच अत्यंत कठीण असेल, यात तिळमात्र शंका नाही.

## प्रथम भीमशब्द साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी राजेंद्र फंड यांची निवड

**३१ मे रोजी नाशिक येथे एकदिवसीय साहित्य संमेलनाचे आयोजन**



**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

तेजस बहुउद्देशीय सामाजिक संस्था, नाशिक यांच्या वतीने येत्या ३१ मे रोजी नाशिक येथील रमाई सभागृह, डॉ. आंबेडकरनगर येथे एकदिवसीय प्रथम भीमशब्द साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी 'ग्रामसेवा संदेश' दिवाळी अंकाचे सहसंपादक राजेंद्र फंड यांची निवड करण्यात आल्याची घोषणा संस्थेच्या अध्यक्षा मेघा डोळस यांनी केली.

तेजस संस्थेच्या कार्याबाबत माहिती देताना त्यांनी सांगितले की, जिथे गरज तिथे तेजस, जिथे वेदना तिथे आधार आणि जिथे प्रतिभा तिथे संधी या ध्येयाने संस्था कार्यरत आहे. गरजू मुलांना अन्न, शिक्षण व आधार देणे, नवोदित कलाकारांना रंगमंच उपलब्ध करून देणे, कवींना व्यासपीठ निर्माण करून समाजाला दिशा देण्याचे कार्य संस्था सातत्याने करत आहे. हे कार्य खऱ्या अर्थाने भीमकार्य असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या संमेलनात अनेक नामवंत साहित्यिक व मान्यवर उपस्थित राहणार आहेत. संमेलनाध्यक्ष म्हणून आचार्य श्री. शंकर अंदानी, दंगलकार कवी नितीन चंदनशिवे उपस्थित राहणार असून उद्घाटक म्हणून समाजकल्याण विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त सौ. जयश्री सोनकवडे उपस्थित राहतील. तसेच आमदार महेश हिरे, नगरसेवक राहुल दिवे, नगरसेविका सविता काळे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर साहित्यिक उपस्थित राहणार आहेत.

राजेंद्र फंड हे शब्दगंध साहित्यिक परिषदेचे प्रसिद्धी प्रमुख असून गेल्या १५ वर्षांपासून ते ग्रामसेवा संदेश हा दिवाळी अंक प्रकाशित करत आहेत. त्यांच्या दिवाळी अंकामुळे महाराष्ट्रभर मोठा साहित्यिक परिवार निर्माण झाला आहे. यावर्षी त्यांनी महाराष्ट्रातील पुणे, कोल्हापूर, सातारा, भंडारा, वडाळा, निमगाव वाघा, श्रीरामपूर, दाभेमोहन, शिर्डी व अहिल्यानगर आदी ठिकाणी विविध साहित्य संमेलनांत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्यामध्ये पाच वेळा संमेलनाध्यक्ष, दोन वेळा स्वागताध्यक्ष, चार वेळा कविसंमेलनाध्यक्ष, एक वेळा विशेष अतिथी तसेच एक वेळा पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. तसेच १४ व्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन, महाबळेश्वर येथे ते आयोजक सदस्य होते. नुकतेच त्यांनी शिर्डी येथे आयोजित केलेले राष्ट्रसंत गाडगेबाबा मराठी साहित्य संमेलन विशेष गाजले होते.

## कृष्णप्रिया वारकरी संस्थेचे १५ दिवसीय निवासी बाल सुसंस्कार शिबिर उत्साहात

**● कोपरगाव । वीरभूमी –**

तालुक्यातील वारी येथील कृष्णप्रिया वारकरी संस्थेतर्फे विद्यार्थ्यांमध्ये अध्यात्म, संस्कार आणि भारतीय संस्कृतीची मूल्ये रुजविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेले १५ दिवसीय 'भव्य निवासी बाल सुसंस्कार शिबिर' मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात संपन्न झाले. शिबिराची सांगता १५ मे रोजी संस्थेच्या संस्थापिका ह.भ.प. भागवताचार्य सुरेखाताई टेके महाराज यांच्या कीर्तनाने झाली. शेवटी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.



दि. १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरामध्ये परिसरातील इयत्ता पहिली ते नववीपर्यंतच्या ५० हून अधिक विद्यार्थी व विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना वारकरी संप्रदायातील आध्यात्मिक व सांस्कृतिक परंपरांचे मार्गदर्शन करण्यात आले.

शिबिरादरम्यान पहाटे सूर्यनमस्कार, धावणे, प्राणायाम, योगासने तसेच हनुमान चालीसा पठण घेण्यात आले. याशिवाय टाळ व पखवाज वादन प्रशिक्षण, गायन तसेच हार्मोनियम (पेटी) वादनाचे शास्त्रशुद्ध शिक्षण देण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी कबड्डी व खो–खो स्पर्धांचे आयोजनही करण्यात आले होते. शिबिराच्या तेराव्या दिवशी विद्यार्थ्यांनी भारुडाचे सादरीकरण केले, तर चौदाव्या दिवशी संस्थेतील विद्यार्थिनी रेणुका वाडगे हिने कीर्तन सादर केले.

महाराष्ट्रातील नामांकित महाराज व अनुभवी कलाकारांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून संस्कारमय वातावरण निर्माण केले. शिबिरामध्ये सहभागी विद्यार्थ्यांसाठी सकाळी चहा, दूध, नाश्ता तसेच दुपारचे व रात्रीचे जेवण यांची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती.

संस्थेच्या संस्थापिका ह.भ.प. भागवताचार्य सुरेखाताई टेके तसेच अध्यक्ष ह.भ.प. विनायक महाराज टेके यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिर यशस्वीरित्या संपन्न झाले. शिबिराच्या अखेरच्या दिवशी मराठी पत्रकार परिषदचे जिल्हा सचिव पत्रकार रोहित टेके यांनी सर्वांचा सन्मान केला.

## रायतळे येथे अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत शेतकऱ्यांना कृषी निविष्ठांचे वाटप

**● पारनेर । वीरभूमी–**

तालुक्यातील मौजे रायतळे येथे सोमवार (दि. १८ मे २०२६) रोजी कृषी विभाग पारनेर आणि पुष्प संशोधनालय (अखिल भारतीय कृषी अनुसंधान परिषद, पुणे), अखिल भारतीय समन्वित पुष्प संशोधन प्रकल्प तसेच विभागीय कृषी संशोधन केंद्र, गणेशखिंड, पुणे (महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी) यांच्या संयुक्त विद्यमाने अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात उपस्थित शेतकरी बांधवांना तज्ज्ञांकडून आधुनिक फुलशेती, बदलत्या हवामानातील शेती व्यवस्थापन तसेच रोगनियंत्रणाबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी विविध कृषी निविष्ठांचे किट मोफत वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे परिसरातील फुलशेती करणाऱ्या तसेच इतर शेतकरी बांधवांची मोठ्या संख्येने लाभलेली उपस्थिती होय. उपस्थित मान्यवरांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती अधिक उत्पादनक्षम व फायदेशीर कशी करता येईल, याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. दत्तात्रय लाड (सहयोगी संशोधन संचालक, विभागीय कृषी संशोधन केंद्र, गणेशखिंड, पुणे) उपस्थित होते. त्यांनी बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर शेतीचे नियोजन कसे करावे, यावर मार्गदर्शन केले. तालुका कृषी अधिकारी गजानन घुले यांनी शासनाच्या विविध कृषी योजनांची माहिती देत शेतकऱ्यांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

तसेच अखिल भारतीय पुष्प संशोधन प्रकल्पाचे पुष्पविशेषज्ञ डॉ. एस. बी. जाधव यांनी व्यापारी तत्त्वावरील फुलशेतीतील संधी व तांत्रिक बाबी स्पष्ट केल्या. तर ज्युनिअर वनस्पती रोगशास्त्रज्ञ डॉ. सुनील लोहाटे यांनी पिकांवरील रोग नियंत्रण, जैविक घटकांचा वापर आणि सेंद्रिय उपाययोजनांविषयी माहिती दिली.



कार्यक्रमादरम्यान शेतकऱ्यांना शेतीसाठी उपयुक्त साहित्य व निविष्ठा किटच्या स्वरूपात मोफत वितरित करण्यात आले. यामध्ये १५ लिटर क्षमतेचा बॅटरी ऑपरेटेड फवारणी पंप, प्रत्येकी पाच आंबा व लिंबू कलमी रोपे, ग्रेड–२ औषध (१ लिटर), ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशक (१ लिटर), फुलांचे बियाणे (२५० ग्रॅम), ॲझोटोबॅक्टर जिवाणू कल्चर तसेच महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांची मार्गदर्शक दैनंदिनी यांचा समावेश होता.

या प्रशिक्षण व वाटप कार्यक्रमास रायतळे व परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कृषी विभागातील मंडळ कृषी अधिकारी, उपकृषी अधिकारी, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक तसेच सहाय्यक कृषी अधिकारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# ईश्वरप्राप्तीसाठी श्रद्धा, निष्ठा आणि सेवाभाव आवश्यक : माधव बाबा

**श्रीक्षेत्र मढी येथे तपपूर्ती सोहळ्यानिमित्त महाप्रसादाचे आयोजन**

**● पाथर्डी । वीरभूमी–**

ईश्वराची आराधना आणि प्राप्ती अत्यंत सोपी व सहज असून, ईश्वराप्रती निष्ठा, श्रद्धायुक्त मन, दृढभाव, त्याच्या अस्तित्वाविषयी अढळ विश्वास आणि ईश्वरप्राप्तीचा एकच ध्यास घेऊन केलेली साधना निश्चितच फलदायी ठरते, असे प्रतिपादन शंकर महाराज मठाचे संस्थापक माधव बाबा यांनी केले.

सद्गुरू शंकर महाराज यांच्या आदेशानुसार माधव बाबांनी सुमारे २५ वर्षांपूर्वी अन्नत्याग करून देशभर भ्रमण केले. विविध तीर्थक्षेत्रांना भेट देत त्यांनी तेथील चैतन्यशक्तीची अनुभूती घेतली. भ्रमणकाळ पूर्ण झाल्यानंतर शंकर महाराजांच्या स्वप्नदृष्टांतानुसार ते श्रीक्षेत्र मढी येथे आले आणि नाथांच्या सानिध्यात वास्तव्यास राहिले.

चैतन्य कानिफनाथ तुझा उपवास सोडवतील. पिठलं, भाकरी, ठेचा असा अन्नमहाप्रसाद तुला मिळेल आणि बारा वर्षांचा उपवास पूर्ण होईल, असे भाकीत त्यांना करण्यात आले होते. नाथांच्या सानिध्यात वास्तव्यास असताना अनेक वेळा विविध रूपांतून त्यांना अन्न स्वीकारण्याचा आग्रह करण्यात आला. कधी देवस्थानच्या कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून, तर कधी तपस्वी साधकाच्या रूपात शंकर महाराजांनी त्यांची अप्रत्यक्ष परीक्षा घेतली.

मात्र, माझ्या गुरूंनी मला जो प्रसाद सांगितला आहे, तो हा नाही. त्यामुळे मी अन्न स्वीकारू शकत नाही, असे अत्यंत कमी शब्दांत उत्तर देत माधव बाबांनी अन्न स्वीकारण्यास नकार दिला. अखेर योग्य वेळी नाथांनी दृष्टांतानुसार महाप्रसाद देत त्यांचा उपवास सोडविला. हा दिवस १८ मे २००८ असा असल्याचे सांगण्यात आले. दीड तपाचा कालावधी उलटल्यानंतरही माधव बाबांच्या सेवेचा सन्मान म्हणून भाविकांकडून दरवर्षी तपपूर्ती सोहळा साजरा केला जातो आणि महाप्रसादाचे वाटप करण्यात येते.

येथील शंकर महाराज मठात माधव बाबांच्या हस्ते शंकर महाराजांच्या मूर्तीची विशेष महापूजा करण्यात आली. दुपारी विविध भागांतून आलेल्या भाविकांसह स्थानिक भाविकांच्या उपस्थितीत महाआरती पार पडली. त्यानंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. आजचा महाप्रसाद वर्धमान रेदासनी परिवार तसेच संजय व अजय पडधरिया परिवार यांच्या वतीने देण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना माधव बाबा म्हणाले की, ईश्वराकडे नेमके काय मागायचे याचे ज्ञान सर्वसामान्य भाविकांना कमी असते. बहुतांश भाविक प्रापंचिक अडचणी आणि समस्यांबाबतच ईश्वरापुढे साकडे घालतात. मात्र, जशी–जशी सेवा ईश्वराच्या दरबारात रुजू होते, तशी साधकाची आध्यात्मिक उन्नती घडत जाते.

शंकर महाराजांची उपासना पद्धती कर्मकांडाशी निगडित नसून सेवाभाव, निष्ठा आणि परोपकार या तत्त्वांवर आधारित असल्याने ती अधिक फलदायी ठरते. सध्याच्या काळात भक्ती आणि सेवा क्षेत्रातही दिखाऊपणा, दांभिकपणा आणि अहंकार यांचा प्रभाव वाढताना दिसतो. मात्र, शंकर महाराजांची उपासना करणाऱ्या साधकाच्या जीवनातील अनिष्ट प्रभाव दूर होऊन त्याला अध्यात्म, मनःशांती आणि लोककल्याणाच्या क्षेत्रात अपार यश प्राप्त होते. त्यासाठी साधना मात्र त्या दर्जाची असावी लागते, असेही त्यांनी सांगितले.

देवाला गर्दी नको असते, देवाला साधक हवा असतो. ज्याच्यामध्ये ईश्वरी सद्गुण आणि सत्कर्माची शक्ती भरून समाजासाठी कार्य करण्याची क्षमता निर्माण होते, तोच खरा साधक, असा संदेश माधव बाबांनी उपस्थित भाविकांना दिला.



SPOT NEWS



## बाळहिरड्याला कवडीमोल भाव, आदिवासी शेतकरी आर्थिक संकटात

**● अकोले । वीरभूमी –**

अकोले तालुक्यातील आदिवासी भागात सध्या बाळहिरडा तोडण्याचे काम जोरात सुरू आहे. रखरखत्या ४२ डिग्री उन्हात आदिवासी बांधव जीवाची पर्वा न करता ५० ते ५५ फुट उंच झाडांवर चढून बाळहिरडा गोळा करत आहेत. ही झाडे डोंगर माथ्यावर अडचणीच्या जागेत वाढतात. बाळ हिरडा गोळा करताना अपघाताचे प्रमाण वाढते. यावरच आदिवासींच्या मुलांचे शिक्षण , आरोग्य, शेतीचे बी-बियाणे, खते आणि चार महिन्यांचे मीठ-मिरची यासाठी हाच एकमेव आर्थिक आधार आहे. मात्र यावर्षी शासनाकडून हमीभाव न मिळाल्याने व्यापाऱ्यांकडून बाळहिरडा केवळ १०० रुपये किलो या कवडीमोल भावाने खरेदी केला जात आहे. शेतकऱ्यांची सर्रास आर्थिक लूट झाल्याने आर्थिक संकटात सापडला आहे. समाजसेवक अनंत महादू घाणे यांनी सांगितले की, दोन वर्षांपूर्वी आंदोलन केल्यावर शासनाने १७० रुपये हमीभाव जाहीर करून बाळ हिरड्याची खरेदी केली होती. नंतर खरेदी बंद केली. यावर्षी आम्ही आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांच्यामार्फत ३०० ते ३५० रुपये प्रति किलो दराने खरेदी करावी, असा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवला आहे. पण तोपर्यंत व्यापारी शेतकऱ्यांना कडून शंभर रुपये भावाने हिरडा खरेदी करत आहेत. हा सर्रास शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. बाळहिरडा गोळा करताना आजपर्यंत अनेकांचे हात-पाय मोडले आहेत, अपंगत्व आले आहे, काही ठिकाणी जीवितहानीच्या घटना घडल्या आहेत. तरीही शासन गंभीर नाही. परंतु अपंगत्व व जीवित हानी झालेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाला शासनाने आर्थिक मदत तातडीने जाहीर करावी. यावेळी शासनाने आदिवासी विकास महामंडळ मार्फत तातडीने ३०० ते ३५० रुपये दराने बाळहिरडा खरेदी सुरू करावी. अशी मागणी केली. यावेळी समाजसेवकअनंत महादू घाणे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तुकाराम खाडे, अध्यक्ष भरत घाणे, नामदेव बांडे, दिलीप भागडे, बाजीराव सगभोर, योगेश खाडे, चंदर गांगड, वसंत सोनवणे, सुनील पवार, सागर रोंगटे, मारुती खाडे, रामदास लांडगे. देविदास भागडे,अमृता झडे, तुकाराम सारूकते,एकनाथ सारुकते, दिपक भागडे,अर्जुन खोडके, निवृत्ती पोकळे सह आदिवासी शेतकरी उपस्थित होते. सदर मागणीचा विचार न झाल्यास अकोले तालुक्यातील हजारो आदिवासी शेतकरी, जनता रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करतील, याची सर्वस्वी जबाबदारी शासनाचे, प्रशासनाची राहील.

## माता रमाई आंबेडकर स्मृतिदिनानिमित्त अहिल्यानगरात तिसरी धम्म परिषद

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

त्याग, समर्पण आणि संघर्षाचे प्रतीक असलेल्या त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त तथागत बुद्धिस्ट सोसायटी (भारत) यांच्या वतीने शहरात तिसऱ्या धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, दि. २७ मे रोजी न्यू टिळक रोड, सक्कर चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक परिसरात हा सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक सोहळा दिवसभर विविध कार्यक्रमांनी संपन्न होणार आहे. या धम्म परिषदेला सर्व समाजबांधव, माता-भगिनी आणि बौद्ध अनुयायांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अहिल्यानगर महापालिकेचे माजी आयुक्त डॉ. पंकज जावळे व तथागत बुद्धिस्ट सोसायटीचे अध्यक्ष संजय कांबळे यांनी केले आहे. धम्म परिषदेच्या निमित्ताने समाजकार्य, महिला सक्षमीकरण आणि आंबेडकरी विचारांच्या प्रसारासाठी योगदान देणाऱ्या सहा महिलांना त्यागमूर्ती माता रमाई गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये मालतीताई मारुती साठे, डॉ. प्रा. रत्ना संजय वाघमारे, डॉ. सिताताई विठ्ठलराव भिंगारदिवे, सुनिताताई माधवराव गायकवाड, ॲड. सुरेखा प्रदीपकुमार चौदंते व गौतमीताई सुरेश भिंगारदिवे यांचा समावेश आहे.

## रविंद्रसिंग परदेशी यांचे निधन

**● पाथर्डी । वीरभूमी –**

शहरातील रविंद्रसिंग (गोटू शेठ) गुलाबसिंग परदेशी (वय ४३)



यांचे नुकतेच अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, मुलगा, मुलगी असा परिवार आहे. ते विश्व हिंदू परिषदेचे तालुकाध्यक्ष उद्योजक व समाजिक कार्यकर्ते किशोरशेठ परदेशी व महेंद्रसिगं परदेशी यांचे लहान बंधू होत. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# देवस्थान इनाम निर्मूलन कायद्याला पाथर्डीत विरोध

### महाराष्ट्र मंदिर महासंघाचे तहसीलदारांना निवेदन । राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा

**● पाथर्डी । वीरभूमी –**

राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाने प्रस्तावित केलेल्या महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम २०२६ या कायद्याच्या विरोधात पाथर्डीत महाराष्ट्र मंदिर महासंघ व विविध मंदिर प्रतिनिधींच्या वतीने तहसीलदार डॉ. उद्धव नाईक यांना निवेदन देण्यात आले. हा कायदा हिंदू देवस्थानांच्या जमिनी, परंपरा आणि धार्मिक स्वायत्ततेवर गदा आणणारा असल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

निवेदनात कायद्यामधील विविध तरतुदींवर आक्षेप नोंदवण्यात आले आहेत. हिंदू मंदिरांच्या जमिनींवरच कारवाई करून वक्फ बोर्डाच्या जमिनींना सूट देण्यात आल्याने संविधानातील समानतेच्या अधिकाराचे उल्लंघन होत असल्याचा दावा आंदोलकांनी केला. तसेच देवस्थानांच्या इनाम जमिनीवरील अतिक्रमणधारकांना मालकी हक्क देण्याची तरतूद मंदिरांच्या उत्पन्नावर परिणाम करणारी असल्याचेही त्यांनी सांगितले.



देवस्थानांच्या जमिनीवरील रस्ते, तलाव, विहिरी यांसारख्या सार्वजनिक वापराच्या जागा शासन मोबदल्याशिवाय ताब्यात घेणार असल्याबद्दल आंदोलकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. महसूल अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरोधात दिवाणी न्यायालयात दाद मागता येणार नसल्याची तरतूद लोकशाहीविरोधी असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

शासनाने हा प्रस्ताव तातडीने मागे घ्यावा, हरकती नोंदवण्यासाठी मुदतवाढ द्यावी तसेच देवस्थान जमिनींच्या संरक्षणासाठी गुजरातप्रमाणे अँटी लँड ग्रॅबिंग कायदा लागू करावा, अशी मागणी करण्यात आली. अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

यावेळी महाराष्ट्र मंदिर महासंघाचे कायदेशीर सल्लागार ॲड. नामदेव जायभाये, ॲड. दिनकरराव पालवे, ॲड. अंबादास शेळके, ॲड. शिवाजीराव दगडखैर, जवखेड येथील अमोल वाघ, ऋषिकेश घाटूळ, आदिनाथ लंघे, अर्णव वाघ, घनशाम वाघ, भाऊराव धायतडक तसेच अकोले येथील श्री दत्त मंदिर, पाथर्डी येथील श्री विजय हनुमान मंदिर व श्रीराम मंदिराचे प्रतिनिधी उपस्थित होते.

तसेच हिंदू जागरण मंचचे बाळासाहेब गीते, धर्मजागरण विभागाचे सारंग मंत्री, हिंदू जनजागृती समितीचे चैतन्य शेकडे, भरत आंधळे, राजेंद्र आव्हाड, पांडूरंग चौधर यांच्यासह तालुक्यातील अनेक मंदिर पुजारी, विश्वस्त आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तहसीलदार डॉ. उद्धव नाईक यांनी निवेदन स्वीकारून संबंधित मागण्या वरिष्ठ स्तरावर पाठवण्यात येतील, असे आश्वासन दिले.

## राष्ट्रवादीच्या रेट्यामुळे अखेर प्रभाग क्र.११ मधील रस्त्याच्या कामांना प्रारंभ : नगरसेविका सोनम त्रिभुवन

**● कोपरगाव । वीरभूमी–**

कोपरगाव शहरातील प्रभाग क्र. ११ मधील रस्त्यांच्या कामांचे भूमिपूजन होवून नागरीकांना हि कामे लवकरात लवकर पूर्ण होणे अपेक्षित होती. परंतु कोपरगाव नगरपरिषदेच्या अडचणीमुळे हि कामे सुरु होत नव्हती. त्याबाबत राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेवकांनी अनेकवेळा मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देवून पाठपुरावा सुरु होता. त्या पाठपुराव्यातून अखेर या रस्त्याच्या कामांना सोमवार (दि.१८) पासून प्रारंभ झाला असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेविका सौ.सोनम त्रिभुवन यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात दिली आहे.



प्रसिद्धी पत्रकात नगरसेविका सौ.सोनम त्रिभुवन यांनी पुढे असे म्हटले आहे की, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात अधिसूचित विशिष्ट नागरी सेवा सुविधा पुरविणे अंतर्गत प्र.क्र.११ मधील वाघ घर ते कन्या शाळा रस्ता अंतर्गत रस्ता करणे (६० लाख), व साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना अंतर्गत बालाजी अंगण ते किरण मवाळ घर रस्ता डांबरीकरण करणे (८.४५ लाख) अशा एकूण ६८.४५ लाखाच्या रस्त्यांच्या कामांसाठी आमदार आशुतोष काळे यांनी निधी उपलब्ध करून दिला होता व आमदार आशुतोष काळे यांच्या हस्ते मागील चार ते पाच महिन्यापूर्वी या कामाचे भूमिपूजन देखील झाले होते.परंतु कोपरगाव नगरपरिषदेच्या अडचणीमुळे हि कामे सुरु होत नसल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने अनेकवेळा कोपरगाव नगरपरिषदेला निवेदने दिली.

विकासकामांना वेळेवर निधी उपलब्ध होत नाही येथे तर आमदार आशुतोष काळे यांनी निधी देवूनही विकासकामे सुरु होत नसल्यामुळे नागरीकांच्या अडचणी वाढल्या होत्या.पावसाळा काही दिवसांवर येवून ठेपला असतांना तत्पूर्वी रस्त्यांची कामे होणे गरजेचे आहे. अन्यथा पावसाळा सुरु झाल्यानंतर रस्त्याची कामे होणार नव्हती आणि पावसाळ्यात रस्ता डांबरीकरण कामे करणे शक्य देखील नव्हते. त्यामुळे या रस्त्याच्या कामांना लवकरात लवकर सुरुवात व्हावी यासाठी सुरु असलेल्या पाठपुराव्यातून अखेर या रस्त्याच्या कामांना सोमवार (दि.१८) पासून प्रारंभ झाला आहे. त्यामुळे प्र.क्र.११ मधील नागरीकांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले असून नागरीकांनी आमदार आशुतोष काळे व रस्त्याचे काम सुरु व्हावे यासाठी पाठपुरावा करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेवकांचे आभार मानले आहे.

## पिसोरे बुद्रुक येथे जुगार अड्ड्यावर मध्यरात्री छापा; ३२ लाखांहून अधिक मुद्देमाल जप्त

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

श्रीगोंदा पोलीस पथकाने बेलवंडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पिसोरे बुद्रुक (ता. श्रीगोंदा) येथे सुरू असलेल्या अवैध जुगार अड्ड्यावर मध्यरात्री धाड टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईत आठ जणांना रंगेहाथ पकडण्यात आले असून दोन आरोपी मोटारसायकलवरून पसार झाल्याची माहिती पोलिसांनी दिली.



पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार शुक्रवार दि. १६ मे रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास सुरू करण्यात आलेली कारवाई शनिवारी दि. १७ मे पहाटे अडीच वाजेपर्यंत सुरू होती. छाप्यात रोख रक्कम, चारचाकी व दुचाकी वाहने, मोबाईल फोन तसेच लॅपटॉप असा एकूण ३२ लाख ५७ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यात रोख रक्कम ७६ हजार ८०० रुपये, २ चारचाकी व २ दुचाकी वाहने त्यांची किंमत अंदाजे २६ लाख रुपये, ५ लाख ११ हजार रुपयांचे १० मोबाईल, ७० हजार रुपयांचा २ लॅपटॉप जप्त करण्यात आला.

कारवाईनंतर आरोपींसह जप्त मुद्देमाल बेलवंडी पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आला असून संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास बेलवंडी पोलीस स्टेशनकडून सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी प्रविणचंद्र लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या छापा पथकात श्रीगोंदा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किरण शिंदे, पोहेकॉ संभाजी वाबळे, पोलीस कॉन्स्टेबल महादेव कोहक, शरद गावडे, रविंद्र जाधव आणि सचिन वारे यांनी सहभाग घेतला.

# ऑनलाईन औषध विक्री तात्काळ बंद करण्याची मागणी

### २० मे रोजी देशव्यापी केमिस्ट बंद । शासनाने दखल न घेतल्यास उग्र आंदोलनाचा इशारा

**● शेवगाव । वीरभूमी –**

ऑनलाईन औषध विक्रीमुळे निर्माण होणारे दुष्परिणाम लक्षात घेऊन ही पद्धत तात्काळ बंद करण्यात यावी, या अत्यंत गंभीर व महत्त्वाच्या मागणीकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी अखिल भारतीय केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीने येत्या बुधवारी (दि. २०) देशभरातील औषध विक्रेते एकदिवसीय बंद पाळणार आहेत. त्यानंतर शासनाच्या प्रतिसादानुसार आंदोलनाची पुढील दिशा ठरविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

यासंदर्भात शनिवारी (दि. १५) येथील महात्मा सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात शेवगाव केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनची वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. संघटनेचे पदाधिकारी तसेच तालुक्यातील केमिस्ट बांधवांच्या उपस्थितीत ऑनलाईन औषध विक्रीविरोधातील ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

तसेच या मागणीसंदर्भातील सविस्तर निवेदन तहसीलदार व पोलिस निरीक्षक यांना देण्यात आले असून त्याच्या प्रती राज्य व केंद्र शासनाला ई-मेलद्वारे पाठविण्यात आल्या आहेत.

यावेळी तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष सुरज पाटील लांडे, बाळासाहेब देशपांडे व गहिनीनाथ बडे यांनी निवेदन दिल्यानंतर या मागणीचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, कोविड काळात नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळावे म्हणून ऑनलाईन औषध विक्रीवरील न्यायालयीन बंदी उठविण्यात आली होती. मात्र कोविडनंतर ती बंदी पुन्हा लागू करणे आवश्यक होते. तसे न झाल्याने देशभरातील सुमारे १३ लाख केमिस्ट आणि त्यांच्यावर अवलंबून असलेली असंख्य कुटुंबे अडचणीत आली असून काही मोजक्याच कॉर्पोरेट कंपन्यांना त्याचा फायदा झाला आहे.

ऑनलाईन औषध विक्रीतून अनेक अवैध प्रकार वाढल्याचाही आरोप त्यांनी केला. या माध्यमातून नार्कोटिक, नशेची तसेच गर्भपातासाठी वापरली जाणारी औषधे सहज उपलब्ध होत आहेत. अपुऱ्या माहितीच्या आधारे घेतलेल्या औषधांमुळे दुष्परिणाम होत असून बनावट औषधांचाही सुळसुळाट वाढल्याने रुग्णांचे हाल होत आहेत. या संदर्भातील अनेक गुन्हे उघडकीस आले असून संबंधितांवर पोलिस कारवाईदेखील झाल्याचे त्यांनी नमूद केले.



काही दिवसांपूर्वी दिल्ली पोलिसांनी 'लाईफ सेव्हिंग मेडिकल कन्सल्टन्सी' संदर्भातील तब्बल ५० कोटी रुपयांचा घोटाळा उघडकीस आणल्याचा उल्लेख करून, देशभरात अशा स्वरूपाचे अनेक गुन्हे सिद्ध झालेले असताना हा धोका का पत्करायचा, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. तसेच २० मेच्या बंदनंतरही शासनाने दखल घेतली नाही, तर अखिल भारतीय केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन उग्र आंदोलनाचा पवित्रा घेईल, असा इशाराही देण्यात आला.

यावेळी संघटनेचे ज्येष्ठ सदस्य गहिनीनाथ बडे यांच्या हस्ते मेडिकल स्टोअरमध्ये बंधनकारक औषध विक्री नोंदीसाठी आवश्यक असलेल्या 'शेड्यूल एच-१' रजिस्टरचे प्रकाशन करण्यात आले. त्यानंतर तालुक्यातील सर्व मेडिकल दुकानदारांना त्याचे वितरण करण्यात आले. तसेच केमिस्ट परिवारातील विशेष गुणवंत विद्यार्थ्यांचाही सन्मान करण्यात आला. सभेत तालुका अध्यक्ष सुरज पाटील लांडे, उपाध्यक्ष गणेश राऊत व सचिव गणेश गवळी यांनी मार्गदर्शन केले.

# सेनापती बापट मल्टिस्टेटमध्ये ३० हजार कष्टकऱ्यांचे १८० कोटी अडकले; पालकमंत्री विखे पाटील यांना निवेदन

**● पारनेर । वीरभूमी –**

सेनापती बापट मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीने पारनेर तालुक्यातील सुमारे ३० हजार ठेवीदारांची तब्बल १८० कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याच्या आरोपावरून संतप्त ठेवीदारांनी शनिवारी पारनेर दौऱ्यावर असलेल्या जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री ठवहरज्ञीळीहपर तळज्ञहश झरींळश्र यांची भेट घेतली. ठेवीदारांनी विखे पाटील यांना सविस्तर निवेदन देत या प्रकरणातील संथ पोलीस तपासाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. दोषींवर कठोर कारवाई न झाल्यास उपोषण करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

यावेळी एकनाथ औटी, काकासाहेब काळे, संपत चेडे, निलेश गाडगे, अजय औटी, महदू लोळगे, राजेंद्र गवळी, पंढरीनाथ साळवे तसेच ड. ऋषिकेश शिंदे यांच्यासह अनेक ठेवीदार व ग्रामस्थ उपस्थित होते.

ठेवीदारांनी दिलेल्या निवेदनानुसार, सेनापती बापट पतसंस्थेचे चेअरमन, कार्यकारी अधिकारी, संचालक मंडळ व व्यवस्थापक यांच्याविरोधात ११ जून २०२५ रोजी पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४६३/२०२५ अंतर्गत 'एमपीआयडी' कायदा तसेच भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्हा सत्र न्यायालयाने सर्व आरोपींचे अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळले होते. मात्र, आरोपींनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात धाव घेतल्यानंतर त्यांना अंतरिम जामीन मिळाला. पोलीस प्रशासनाने उच्च न्यायालयात ठेवीदारांची बाजू प्रभावीपणे मांडली नसल्यामुळेच मुख्य आरोपींना दिलासा मिळाल्याचा आरोप ठेवीदारांनी केला आहे. शेकडो कोटी रुपयांचा अपहार करूनही आरोपी मोकाट फिरत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

पतसंस्थेच्या २९ शाखांमधून ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी आणि ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या आयुष्यभराची पुंजी संस्थेत गुंतवली होती. संस्थेच्या २०२३-२४ च्या लेखापरीक्षण अहवालानुसार ठेवींची रक्कम तब्बल १८० कोटी ३५ लाख रुपये इतकी आहे. मात्र मुदत संपूनही ठेवीदारांना अद्याप एकही रुपया परत मिळालेला नाही.

या आर्थिक संकटामुळे अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली असून अनेकांचे भविष्य अंधारात गेले असल्याचे ठेवीदारांनी सांगितले. पोलीस अधीक्षक कार्यालयाशी वारंवार पत्रव्यवहार करूनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याची नाराजीही त्यांनी व्यक्त केली.

या प्रकरणात फरार तसेच जामिनावर असलेल्या सर्व आरोपींना तातडीने अटक करण्यात यावी, अशी मागणी ठेवीदारांनी केली आहे. तसेच पतसंस्थेचे तातडीने फॉरेन्सिक ऑडिट करून अपहाराची अचूक रक्कम निश्चित करावी, 'एमपीआयडी' कायद्यानुसार पतसंस्थेच्या तसेच आरोपींच्या वैयक्तिक मालमत्ता जप्त कराव्यात आणि मालमत्तांचे बेकायदेशीर हस्तांतरण रोखावे, अशी मागणी करण्यात आली.

याशिवाय, पतसंस्थेचे भूतपूर्व संस्थापक, प्रवर्तक व तत्कालीन संचालक मंडळालाही या गुन्ह्यात आरोपी करण्यात यावे आणि पतसंस्थेवर प्रशासक नेमण्यासाठी राज्य शासनाच्या गृहविभागाकडे तातडीने प्रस्ताव पाठवावा, अशी



मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

आपल्या हक्काच्या पैशांसाठी ठेवीदारांनी प्रशासनाकडे उपोषणासाठी परवानगी मागितली असून, पालकमंत्री विखे पाटील या प्रकरणात कोणती ठोस पावले उचलतात, याकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

## शिर्डीत २३ मे रोजी संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्या हस्ते

# देशातील सर्वांत मोठ्या खासगी संरक्षण तोफगोळा कारखान्याचे उद्घाटन

### दरवर्षी ५ लाख १५५ मिमी तोफगोळ्यांचे उत्पादन । अहिल्यानगर जिल्हा बनणार संरक्षण उत्पादनाचे नवे केंद्र

**● शिर्डी । वीरभूमी –**

अहिल्यानगर जिल्ह्यात प्रथमच मोठ्या प्रमाणावर संरक्षण साहित्य उत्पादन उद्योग उभा राहत असून, शिर्डी येथील सावळीविहीर औद्योगिक वसाहतीत उभारण्यात आलेल्या तोफगोळा उत्पादन प्रकल्पाचे उद्घाटन येत्या २३ मे रोजी संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांच्या हस्ते होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपस्थित राहणार असून, या प्रकल्पामुळे जिल्हा देशातील महत्त्वाचे संरक्षण उत्पादन केंद्र म्हणून विकसित होणार असल्याची माहिती जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील व ग्लोब फोर्ज लिमिटेडचे संचालक तथा चेअरमन रविकांत यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली.






या प्रकल्पामध्ये १५५ मिलीमीटर क्षमतेच्या तोफगोळ्यांचे उत्पादन करण्यात येणार असून, प्रतिवर्षी पाच लाख तोफगोळे तयार करण्याची क्षमता या कारखान्याची असेल. खासगी क्षेत्रातील तोफगोळा उत्पादनाची ही देशातील सर्वांत मोठी क्षमता मानली जात असून, संपूर्ण उत्पादन तंत्रज्ञान व कच्चा माल स्वदेशी आहे. हा प्रकल्प अवघ्या एका वर्षात उभारण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'आत्मनिर्भर भारत', 'मेक इन इंडिया' व 'मेक फॉर द वर्ल्ड' या संकल्पनांना बळ देणारा हा महत्त्वाचा प्रकल्प असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

शिर्डी औद्योगिक वसाहतीतील सुमारे दोनशे एकर क्षेत्रावर विविध संरक्षण प्रकल्प विकसित करण्यात येत आहेत. यामध्ये रॉकेट लाँचर, लांब पल्ल्याच्या रॉकेटचे सुटे भाग, स्वयंचलित ड्रोन व विविध इलेक्ट्रॉनिक यंत्रणांच्या चाचणी सुविधा विकसित केल्या जात आहेत. या प्रकल्पांसाठी सुमारे एक हजार कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित असून, त्यापैकी सहाशे कोटी रुपयांची गुंतवणूक पूर्ण झाली आहे. या माध्यमातून सुमारे दोन हजार नागरिकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होणार आहे. याच दिवशी प्रतिदिन पंधरा टन क्षमतेच्या बायो-सीएनजी प्रकल्पाचेही उद्घाटन करण्यात येणार आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी येथे राज्य शासनाने उपलब्ध करून दिलेल्या सुमारे सहाशे एकर जागेवर भव्य दारूगोळा निर्मिती संकुल उभारण्यात येत आहे. या संकुलात टीएनटी, आरडीएक्स, एचएमएक्ससारखी विविध स्फोटके व प्रणोदक तयार करणारे कारखाने उभारले जात असून, त्यासाठी सुमारे दोन हजार कोटी रुपयांची अतिरिक्त गुंतवणूक प्रस्तावित आहे. दरवर्षी वीस हजार टन टीएनटी उत्पादनाची क्षमता येथे निर्माण होणार असून, सरकारी व खासगी क्षेत्रातील ही देशातील सर्वांत मोठी क्षमता ठरणार आहे. टीएनटी व आरडीएक्स निर्मितीचे कारखाने पूर्णपणे स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित असून, त्यांचे उद्घाटन व सादरीकरण लवकरच होणार आहे.

शिर्डी येथे तयार होणाऱ्या तोफगोळ्यांमध्ये स्फोटके भरण्याचे महत्त्वाचे काम अहिल्यानगर येथील प्रस्तावित कारखान्यात केले जाणार आहे. सर्व प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यानंतर जिल्ह्यातील सुमारे चार ते पाच हजार तरुणांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होणार असल्याचे पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी सांगितले. जिल्ह्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांनाही या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध होणार आहेत.

अहिल्यानगर जिल्ह्याला संरक्षण क्षेत्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली असून, रणगाडा प्रशिक्षण केंद्र, के.के. रेंजेस व मेकॅनाईज्ड इन्फंट्री रेजिमेंटल सेंटरमुळे जिल्ह्याला आधीपासूनच संरक्षण क्षेत्रातील महत्त्व आहे. नव्या प्रकल्पांमुळे या ओळखीला अधिक बळ मिळणार असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले. शिर्डी हे धार्मिक स्थळ असल्याने प्रदूषणाचा धोका टाळण्यासाठी हा प्रकल्प विशेष रासायनिक क्षेत्रात उभारण्यात आला आहे.

स्थानिक युवकांना रोजगारासाठी सक्षम करण्याच्या उद्देशाने उद्योगांच्या गरजेनुसार कौशल्य विकासावर विशेष भर देण्यात येत आहे. रतन टाटा ट्रस्टच्या सहकार्याने औद्योगिक वसाहतीमध्ये विशेष इनोव्हेशन सेंटर सुरू करण्यात येत असून, त्यासाठी दोनशे कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. एमआयडीसीकडूनही पन्नास कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. राहाता येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे स्थलांतर एमआयडीसी परिसरात करण्यात आले असून, भविष्यातील विस्तारासाठी सुपे परिसरात संरक्षण विभागाच्या जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया प्राथमिक स्तरावर सुरू असल्याची माहितीही देण्यात आली.

या उद्घाटनाच्या निमित्ताने २३ व २४ मे रोजी विशेष संरक्षण प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. देशातील प्रमुख संरक्षण उत्पादन कंपन्या व शंभरहून अधिक सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग या प्रदर्शनात सहभागी होणार आहेत. जिल्हाभरातून नागरिक या प्रदर्शनाला भेट देतील व तरुणांसाठी संरक्षण क्षेत्रातील संधी जाणून घेण्याची ही मोठी संधी ठरणार असल्याचे पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

# पाथर्डीच्या सुपुत्र अक्षय पवारचा सुवर्णयुग तरुण मंडळाकडून सत्कार

**● पाथर्डी । वीरभूमी –**

पाथर्डी शहराचे सुपुत्र तथा घिसाडी समाजातील युवक अक्षय हरिभाऊ पवार यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या भारतीय वन सेवा या प्रतिष्ठित परीक्षेत दैदिप्यमान यश संपादन करून पाथर्डी तालुक्याचे नाव उंचावले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शहरातील सुवर्णयुग तरुण मंडळ यांच्या वतीने त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.



अक्षय पवार यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, सामान्य कुटुंबातून पुढे येत जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमांच्या जोरावर हे यश मिळवले आहे. त्यांच्या यशामुळे संपूर्ण पाथर्डी तालुक्यासह सर्व स्तरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, अनेक युवकांसाठी ते प्रेरणास्थान ठरत आहेत.अक्षय पवार यांच्या यशामुळे ग्रामीण भागातील युवकांनी मोठी स्वप्ने पाहून सातत्याने प्रयत्न केल्यास कोणतेही ध्येय अशक्य नसते, असा विश्वास तरुणांमध्ये निर्माण झाला आहे. असे गौरवोद्गार यावेळी रासने यांनी काढले.

रविवारी सकाळी विर सावरकर मैदान परिसरातील हरिभाऊ पवार यांच्या निवासस्थानी आयोजित करण्यात आलेल्या या सत्कार समारंभात अक्षय पवार यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन व मानाचा फेटा बांधून सन्मान करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या यशाचे कौतुक करत भविष्यातील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष वैभव शेवाळे, उत्सव समितीचे अध्यक्ष गोपालसिंग शेखावत, अभय गांधी, अनिल खाटेर, उमेश रासने, दिंगबर जोजारे, अक्रम आतार, योगेश घोडके, मोनिश उदबत्ते, मुकुंद सुराणा, भैय्या पानगे, इंजि. शाहरुख शेख यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संजीवनी पॉलिटेक्निकच्या ३५ विद्यार्थ्यांना सुंगवू हायटेकमध्ये नोकरी

**● कोपरगाव । वीरभूमी–**

संजीवनी के. बी. पी. पॉलिटेक्निकच्या एकाच वेळी पस्तीस विद्यार्थ्यांना सुंगवू हाय टेक या मुळच्या दक्षिण कोरियाच्या ऑटोमोबाईल घटक उत्पादन करणाऱ्या कंपनीने नोकरीची संधी दिली. या सर्वांना आकर्षक पॅकेज देण्यात आले. ट्रेनींग अँड प्लेसमेंट विभागाच्या पुढाकारातून त्यांना ही संधी मिळाली. पालक आणि विद्यार्थी यांचा विश्वास सार्थ करणे हाच संजीवनीचा ध्यास आहे.



उद्योगाभिमुख शिक्षणपद्धती आणि कौशल्यविकास उपक्रमांचे हे फलित आहे. पालक आणि विद्यार्थ्यांनी संस्थेवर टाकलेल्या विश्वासाला सार्थ ठरवीण्यासाठी ट्रेनींग अँड प्लेसमेंट विभाग कार्यरत आहे. प्रत्येक विद्यार्थ्याचे नोकरी किंवा उद्योगात करिअर घडावे अथवा त्याचे उच्च शिक्षणाचे स्वप्न पूर्ण व्हावे, यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यावर विशेष मेहनत घेतली जाते. व्यवस्थापनाच्या दर्शनाखाली प्राचार्य, विभाग प्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाची संपूर्ण टीम त्यासाठी प्रयत्नशील असते. त्यामुळे विद्यार्थ्यांना करिअर घडवीण्याच्या संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होतात.

नोकरीची संधी मिळालेल्या विद्यार्थ्यांत मेकॅनिकल इंजिनिअरींगच्या तब्बल ३५ विद्यार्थ्यांची आकर्षक पगारावर निवड केली. यात अक्षय कैटाके, कार्तिक वर्खडे, आदित्य पवार, अभिषेक रहाणे, चैतण्य देवकर, अभिषेक काळे, विकास मतसागर, आकाश जाधव, किरण त्रिभुवन, सिध्दार्थ वणे, सनी गायकवाड,समर्थ रहाणे, विशाल धनवटे, ऋतिक गव्हाणे, गौरव सोनवणे, आदित्य विश्वम्भर, सार्थक सोनवणे, शिवराम शिरसाठ, विवेक वणे, श्रध्दा डेंगळे, अतुल खरड, कोमल दैने, नील पवार, प्रथमेश त्रिभान, साक्षी गुरसळ, ऐश्वर्या शिंदे, राजश्री बोठे, निकिता गांगुर्डे, विद्या जगताप, प्रियंका घोपाळ, बब्बी कुमार, सोनु कुमार, राजु प्रसाद, सनी कुमार व मोहम्मद सलाउद्दीन यांचा समावेश आहे. यातील बहुतांशी विद्यार्थी हे ग्रामीण भागातील आहे.

संस्थेचे अध्यक्ष नितिनदादा कोल्हे आणि कार्यकारी विश्वस्त अमित कोल्हे यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार केला. यावेळी प्राचार्य ए. आर. मिरीकर आदी उपस्थित होते.

### आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण झाले

■ मी सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थी आहे. शिक्षण पूर्ण करून स्वावलंबी बनावे, ही माझ्या आई-वडिलांची इच्छा होती. संजीवनीमध्ये प्रवेश घेतल्यानंतर माझ्या कष्टकरी आई-वडिलांचे आणि माझ्या आर्थिक स्वावलंबनाचे स्वप्न पूर्ण होईल, असा विश्वास होता. तो आज खरा ठरला. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाने आम्हा सर्व विद्यार्थ्यांची मुलाखतीसाठी उत्तम तयारी करून घेतली होती, अशी भावना विद्यार्थी आकाश जाधव यांनी व्यक्त केली.

## गुरुकुलचा समर्थ शेळके बारावी सीबीएसई बोर्डामध्ये जुन्नर-आंबेगाव तालुक्यातून प्रथम

**● निघोज । वीरभूमी –**

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ गुरुकुल, बेल्हे-बांगरवाडी या सीबीएसई मान्यताप्राप्त इंग्रजी माध्यमाच्या शाळेचा इयत्ता बारावी उइडए बोर्ड परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून विद्यालयाने उत्कृष्ट यश संपादन केल्याची माहिती प्राचार्य सतीश कुऱ्हे यांनी दिली.

या निकालामध्ये समर्थ विवेक शेळके याने ९०.६० टक्के गुण मिळवून वाणिज्य शाखेत जुन्नर व आंबेगाव तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. तसेच विज्ञान शाखेत कु.श्वेता बाबाजी बांगर हिने ७८.२० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला.

इतर गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये चि.रिहान जमीर पटेल याने ७७.२० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक, चि. सार्थक जनार्धन घाडगे याने ६९.८० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक, कु. श्वेता संदीप मटाले हिने ६९.४० टक्के गुण मिळवून चतुर्थ क्रमांक,कु.स्नेहा महेंद्र रोकडे हिने ६८.८० टक्के गुणांसह पाचवा क्रमांक तर चि.तन्मय सुरेश गलांडे याने ६७.४० टक्के गुण मिळवून सहावा क्रमांक पटकावल्याची माहिती समर्थ गुरुकुलचे प्राचार्य सतीश कुऱ्हे यांनी दिली.

या सर्व विद्यार्थ्यांना डॉ.शिरीष गवळी, प्रा. संकेत वामन, प्रा. आरती लंके, डॉ.रुस्तुम दराडे, प्रा. स्वाती पवार, प्रा. गणेश बोरचटे, प्रीती काकडे, प्रा. रामचंद्र मते, प्रा. रोहित जाधव, प्रा. सुकन्या हिंगे, प्रा.पूजा भुजबळ, प्रा. सोमनाथ कदम, प्रा.अनिल कदम व प्रा. प्रियंका गाडगे यांनी अध्यापन केले.तसेच क्रीडा संचालक हरिश्चंद्र नरसुडे व पर्यवेक्षक सखाराम मातेले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## सर्व विषयांत तंतोतंत ३५ गुण मिळवत साधला अनोखा 'परफेक्ट बॅलन्स'

**● अकोले । वीरभूमी –**

सत्यनिकेतन संचलित गुरुवर्य रा. वि. पाटणकर सर्वोदय विद्या मंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, राजूर येथील इयत्ता १० वीतील विद्यार्थी सुशांत मच्छिंद्र रोंगटे याने दहावीच्या परीक्षेत सर्वच ६ विषयांत तंतोतंत ३५ गुण मिळवत एक आगळावेगळा आणि अनोखा विक्रम प्रस्थापित केला आहे. गणिताच्या भाषेत हा केवळ योगायोग नसून एक परफेक्ट स्टॅटिस्टिकल वंडर असल्याचे कौतुक केले जात आहे.

सुशांतने मिळवलेल्या या विशेष निकालाची माहिती समाजमाध्यमांवर पसरल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रभर त्याची चर्चा झाली. प्रतिकूल परिस्थितीत मिळवलेल्या या यशामुळे त्याच्याबद्दल सर्वत्र कुतूहल व्यक्त होत आहे.

सुशांत हा आर्थिकदृष्ट्या गरीब आदिवासी कुटुंबातील विद्यार्थी आहे. त्याला एक लहान बहीण आहे. त्याचे आई-वडील चाकण येथे कामानिमित्त असतात. हरिश्चंद्रगडाच्या पायथ्याशी असलेल्या सावरकुटे गावात तो आपल्या अपंग आजी-आजोबांसोबत राहतो. घरकाम आणि शेतीची जबाबदारी सांभाळत तो दररोज आठ किलोमीटर अंतरावर असलेल्या राजूर येथील शाळेत बसने प्रवास करून शिक्षण घेत असे.

या कठीण परिस्थितीतही सुशांतने इयत्ता १० वीची परीक्षा उत्तीर्ण होत सर्व विषयांत ३५ गुण मिळवत ३५ टक्के गुणांनी उत्तीर्ण होण्याचा अनोखा विक्रम नोंदवला आहे.

सुशांतने भविष्यात चांगले शिक्षण घेऊन करिअर घडवण्याची इच्छा व्यक्त केली. यावर विनायकराव पाटील यांनी त्याच्या शिक्षणाची व करिअरची जबाबदारी स्वीकारत त्याला दत्तक घेण्याची घोषणा केली. तसेच त्याच्या शिक्षणाचा संपूर्ण खर्च उचलण्याचे आश्वासन दिले.

सत्यनिकेतन संस्थेचे ज्येष्ठ संचालक विजय पवार यांनीही सुशांत व त्याच्या पालकांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

सुशांतची आई व मावशी या दोघीही सर्वोदय विद्या मंदिर, राजूरच्या माजी विद्यार्थिनी आहेत. सुशांत इयत्ता ८ वीपासून याच विद्यालयात शिक्षण घेत आहे.

विद्यालयाचे प्राचार्य बी. के. बनकर यांनी सुशांतच्या यशाचे कौतुक करताना सांगितले की, पालक व शाळेच्या सहकार्याने सुशांत भविष्यात नक्कीच मोठी प्रगती करेल.

दरम्यान, समाजात ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक होते, मात्र अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत ३५ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण होणाऱ्या सुशांतसारख्या विद्यार्थ्यांनाही समाजाने प्रोत्साहन द्यावे, अशी भावना विनायकराव पाटील यांनी व्यक्त केली. यावेळी संचालक विजय पवार, ज्येष्ठ पत्रकार प्रकाश महाले, प्राचार्य बी. के. बनकर, उपप्राचार्य डी. जी. बुऱ्हाडे तसेच शिक्षक दीपक पाचपुते, संजय देशमुख व रवींद्र मढवई उपस्थित होते. एका गरीब आदिवासी कुटुंबाला आधार दिल्याबद्दल विनायकराव पाटील यांचे सर्वांनी आभार मानले.

# जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावरच यश तुमच्या पायाशी लोळण घेईल

### आमदार आशुतोष काळे । राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने १० वी १२ वीच्या गुणवंतांचा गुण गौरव सोहळा

**● कोपरगाव । वीरभूमी–**

शिक्षण हे केवळ गुण मिळवण्याचे माध्यम नसून व्यक्तिमत्त्व घडविण्याची आणि उज्वल भविष्याची पायाभरणी करणारी प्रभावी शक्ती आहे. जीवनात मोठे ध्येय गाठायचे असेल तर सातत्यपूर्ण प्रयत्न, सकारात्मक दृष्टिकोन आणि आत्मविश्वास अत्यंत महत्वाचा असून जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावरच यश तुमच्या पायाशी लोळण घेईल असा बहुमोल सल्ला आमदार आशुतोष काळे यांनी ईयत्ता १० वी १२ वीच्या गुणवंतांना दिला.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, कोपरगाव यांच्या वतीने कलश मंगल कार्यालय येथे कोपरगाव मतदार संघातील ईयत्ता दहावी, बारावी तसेच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करून प्राविण्य मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य 'गुणगौरव सोहळा' रविवार (दि.१७) रोजी आमदार आशुतोष काळे यांच्या शुभहस्ते सुप्रसिद्ध हास्यकवी अशोक नायगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला. याप्रसंगी ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप पडल्यास त्यांना भविष्यात अजून यशाची मोठी शिखरे सर करण्याची प्रेरणा मिळावी यासाठी दरवर्षी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्षाच्या वतीने आवर्जून ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. आजचा हा गौरव केवळ विद्यार्थ्यांचा नाही तर त्यांना अनमोल मार्गदर्शन करणाऱ्या गुरुजनांचा आणि त्यांच्या यशामागे खंबीरपणे उभे राहणाऱ्या पालकांचा देखील आहे.आजची तरुण पिढी हेच उद्याचे भविष्य असून विद्यार्थ्यांनी केवळ पद आणि संपत्ती मिळवण्यासाठी नाही तर देशाच्या उभारणीसाठी आपल्या ज्ञानातून काय योगदान देवू शकतो याचा विचार केला पाहिजे. पुढील शिक्षण घेताना नवीन सवंगडी निवडतांना योग्य व्यक्तीची निवड करा. तुम्हीं मिळविलेल्या यशातून आपल्या गावाचा, तालुक्याचा आणि जिल्ह्याचा अभिमान वाढला पाहिजे याची जाणीव ठेवा. मोठे व्हा, पण आपल्या मातीशी नाळ जोडून ठेवा असे सांगितले.

यावेळी सुप्रसिद्ध हास्य कवी यांनी आपल्या मनोगतात सांगितले कि, हे स्पर्धेचे युग आहे शिक्षण आणि पदव्या मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांपुढे अनेक आवाहन आहेत. त्यमुळे मिळविलेल्या पदवीबरोबरच स्वतःच्या अंगी असलेली कला जोपासा त्या कलेचा तुमचे भविष्य उज्वल करण्यासाठी निश्चितपणे मदत होईल. मराठी भाषा हि जगात सगळ्यात चांगली भाषा आहे. हि भाषा जपण्याची जबाबदारी आपल्या सगळ्यांवर आहे. बाहेरच्या देशात राहणारी मराठी माणस मराठी अस्मिता जपत आहे. याचा खूप अभिमान वाटतो.

आयुष्यात पहिल्यांदा गोदामाईच्या कुशीत वसलेल्या कोपरगाव नगरीत आलो. विविधतेने नटलेले हे गाव अतिशय समृद्ध आहे. कर्मवीर शंकररावजी काळे साहेब यांना देखील भेटल्याच्या आठवणींना त्यांनी उजाळा दिला. आमदार आशुतोष काळे अतिशय शांत आणि सोज्वळ आणि राजबिंड व्यक्तिमत्व आहे. ते आवर्जून गुणवंतांचा सत्कार करतात हि अतिशय कौतुकास्पद गोष्ट आहे. कार्यक्रमाची गर्दी बघून मराठीपणाचा अभिमान वाटत असून हीच खरी महाराष्ट्राची संस्कृती असल्याचे त्यांनी सांगितले.




याप्रसंगी कर्मवीर शंकरराव काळे मित्र मंडळाचे अध्यक्ष कारभारी आगवण, उपाध्यक्ष नारायणराव मांजरे, ज्ञानदेव मांजरे, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रविण शिंदे, कोपरगाव जिनिंग व प्रेसिंग सोसायटीचे चेअरमन गोरक्षनाथ जामदार, गौतम बँकेचे व्हा. चेअरमन विजयराव रक्ताटे, कारखान्याचे संचालक दिलीपराव बोरनारे, सचिन चांदगुडे, शंकरराव चव्हाण, श्रीराम राजेभोसले, दिनार कुदळे, प्रशांत घुले, सुनिल मांजरे, वसंतराव आभाळे, विष्णू शिंदे, महात्मा गांधी जिल्हा प्रदर्शन चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव धरमचंद बागरेचा, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष चारुदत्त सिनगर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रामदास केकाण, जिनिंग व प्रेसिंगचे संचालक शिवाजीराव शेळके, महेश लोंढे, गौतम बँकेचे संचालक शिरीष लोहकणे, माजी नगराध्यक्ष विजयराव वहाडणे, डॉ. चंद्रशेखर आव्हाड, राष्ट्रवादी युवकचे तालुकाध्यक्ष शशिकांत देवकर, नगरसेवक मंदार पहाडे, राजेंद्र वाकचौरे, जनार्दन कदम, सोमेश आढाव, संदिप कपिले, विजय त्रिभुवन, राहुल शिरसाठ, वाल्मिक लहिरे, सोमनाथ आढाव, सुनिल शिलेदार आदींसह कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व संलग्न संस्थांचे पदाधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, गुणवंत विद्यार्थी, पालक आदी उपस्थित होते.